म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. 232

REFBK-0009748

# आरसेनुहिमाचल

मराठी ग्रंथ संग्रालय. ठाणें.
अनुक्रम 23032 वि.
क्रमांक ...232..... नोः

# "आसेतुहिमाचल"

| | |
|---|---|
| पूर्वार्ध पृष्ठसंख्या | २०४ |
| उत्तरार्ध पृष्ठसंख्या | २७८ |
| प्रस्तावना वगैरे मिळून | ३६ |
| एकूण पृष्ठें | ५१८ |

" पायीं तीर्थयात्रा घडो । देह संतापरीं पडो "

तुकाराम

# आसेतुहिमाचल

## कन्याकुमारी ते बदरीनारायण
## तीर्थें क्षेत्रें व शहरें आणि
## विविध दर्शनें



लेखक :

## विनायक गोविंद सहस्रबुद्धे

वीर--रसायन, वीरश्रीशृंगार, नूपुर, संजीवनीहरण
सत्यनारायण, इत्यादि पोवाडे व स्फुट

REFBK-0009748

प्रथमावृत्ति–

मूल्य पांच रुपये

" पायीं तीर्थयात्रा घडो । देह संताघरीं पडो "

तुकाराम

# आसेतुहिमाचल

## कन्याकुमारी ते बदरीनारायण

## तीर्थें क्षेत्रें व शहरें आणि

## विविध दर्शनें



लेखक :

## विनायक गोविंद साठ्ये

वीर--रसायन, वीरश्रीशृंगार, नूपुर, संजीवनीहरण

सत्यनारायण, इत्यादि पोवाडे व स्फुट

REFBK-0009742

REFBK-0009748

प्रथमावृत्ति–

मूल्य पांच रुपये

प्रकाशक :
स्नेह संवर्धक संघ मिरज

सर्व हक्क स्वाधीन

पुस्तकें विनायक गोविंद साठये,
'राधागोविंदधाम' ब्राम्हणपुरी, मिरज
यांच्याकडे मिळतील.

मुद्रक:
नीलकंठ विश्वनाथ महाबळ
गजानन मुद्रणालय, मिरज.

क्रमांक ...२३२... दि: .....

# अर्पण पत्रिका

ना संसार-नभीं सरस्वति, कुठे मीं तूं सुखें संचरूं
स्वप्राणा मुकलींस तों यमशरें तूं कोवळें पांखरूं !
प्रेमात्मा अमर स्वयें पण नव्या नांवा स्वरूपा धरीं
माझी होसिं अशी पुनः सहचरी तूं सत्यभामे खरी !

* * *

स्निग्धे, हो मम तूं सरस्वति, जुनी वा सत्यभामे, नव
जी सोत्साह सदैव मत्सुखरता निःस्वार्थिनी यास्तव
हा आसेतु हिमाचल प्रियतमे, मीं ग्रंथ अर्पीं तुला
यात्रान्तीं प्रभुचा प्रसाद शिरसा भाग्यें मला लाभला !

— विनायक गोविंद साठये

श्रीमंत नारायणराव तात्यासाहेब पटवर्धन राजेसाहेब

मिरज (सीनियर) यांनीं लिहिलेली

# प्रस्तावना

मिरज हायस्कूलचे एका काळचे माझे शिक्षक कै. गोविंद महादेव साठ्ये यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. विनायक गोविंद साठ्ये यांनीं त्यांच्या " आसेतुहिमाचल " या पुस्तकास मी प्रस्तावना लिहून द्यावी अशी मला विनंति केली. पोष्टांत नोकरी करीत असतांना व सेवा-निवृत्त झाल्यावर त्यांनीं हिंदुस्थानांतील बऱ्याच तीर्थयात्रा केल्या. त्या यात्रांचें व प्रवासांचें वर्णन या पुस्तकरूपानें ते प्रसिद्ध करीत असल्याचें पाहून मला आनंद वाटला व त्याबद्दल मीं त्यांचें अभिनंदनहि केलें. पण माझ्यासारख्याचेकडून प्रस्तावना लिहून न घेतां एखाद्या अधिकारी विद्वानाकडून आपण प्रस्तावना लिहून घेतल्यास तें अधिक बरें असें मी त्यांना त्यावेळीं नम्रपणें सुचविलें.

या भारत भूमीतील पुष्कळशा तीर्थयात्रा मी केल्याचें त्यांना माहित होतें. तेव्हां त्यावर त्यांचें म्हणणें असें कीं अशा यात्रावर्णनाच्या पुस्तकांना विद्वानांचेकडून प्रस्तावना लिहून घेण्यापेक्षां यात्रा केलेल्यानें लिहिल्यास अधिक योग्य. " आपण या भरतभूमीतील तीर्थयात्रा केल्या आहेत. शिवाय परदेशांतहि प्रवास केला आहेत; तेव्हां आपणच प्रस्तावना लिहून द्यावी " असा मला त्यांनीं पुनः आग्रह केला. त्यावरून हे चार शब्द मी लिहीत आहें.

आमच्याकडे प्रवासाची हौस थोडी कुणी केलीच तरी त्याचें वर्णन लिहून काढून छापून प्रसिद्ध करणारे फार थोडे. मात्र अलीकडे प्रवासाची साधनें जास्त सुलभ होऊं लागली आहेत त्याचबरोबर प्रवासाची आवडही वाढू लागली आहे हें सुचिन्ह होय. श्री. साठ्ये

यांच्यासारख्यांनीं केलेल्या प्रवासाचें वृत्त छापून काढल्यामुळें ज्यांना ज्यांना यात्राप्रवास करणेचा असेल त्यांना त्याचा उपयोग खचित होईल. अशी यात्रा व प्रवासवर्णनें छापण्याचा उपयोग होतो तो हाच. सामान्य वाचकांनाहि यात्रांचीं वर्णनें वाचून यात्रा करण्याची स्फूर्तिही यापासून मिळते व करमणूक होते.

श्री. साठ्ये एक साधे पोष्टमास्तर. त्यांनीं आपली नोकरी संभाळून या यात्रा केल्या हें त्यांना भूषणावह आहे. याचें कारण मी इतकेंच समजतों कीं त्यांची अंतःकरणाची इच्छा फार तीव्र यांत शंका नाहीं. यात्रेंत येईल त्या प्रसंगास तोंड द्यावें लागतें. वाचकांनीं श्री. साठ्ये हे हिमालयांतील यात्रा करीत असतांना पंगराणा येथें पडलेल्या दरोड्याची त्यांनीं दिलेली हकीकत जरूर पहावी. आगगाडी, मोटारी वगैरेसारखी सुलभ वाहनें यांतून यात्रा करणें वेगळें व हिमालयांतील पायीं यात्रा करणें वेगळें. या पायाच्या यात्रेंत पैसा व मनुष्यबळ हें पाहिजेच. पण कांहीं ठिकाणीं या दोहोंचाहि उपयोग होत नाहीं. केवळ स्वतःवरच अवलंबून राहण्याची पाळी येते. कैलासाच्या यात्रेंत हाच अनुभव मला आला. याला निश्चयहि पाहिजे " निश्चयाचें बळ । तुका म्हणे तेंचि फळ " हें संतांचें वचन खरें यांत शंका नाहीं.

यात्रेंत फिरल्यानें मनुष्यांत चौकसपणा येतो. निरनिराळे रीतिरिवाज व समाजाचें भिन्न भिन्न प्रकार पाहण्यास मिळतात. त्यामुळें सहजच स्वतःच्या गुणदोषांचें निरीक्षणहि करावयास मिळतें व आपणांत त्यामानानें सुधारणाहि होऊं शकते. आपल्या एकट्याप्रमाणें अनेक मिळूनच कोणताहि समाज तयार होत असतो. तेव्हां आपल्यांत एखादी योग्य अशी सुधारणा झाल्यास यात्रेहून परत आपल्या गांवीं आल्यावर ती बरी गोष्ट इतरांच्या नजरेला आली तर तेहि त्याचें अनुकरण करितात. यामुळें सहज सुलभतेनें सामाजिक सुधारणा होऊं शकते हा एक फायदा होतोच.

श्री. साठये यांची भाषा सुलभ व वर्णनशैली चांगली, यामुळें पुस्तक वाचण्याचा कंटाळा येत नाहीं. शिवाय मध्यम स्थितीतील लोकांना त्यांचें पुस्तक चांगलेंच उपयोगी पडेल, कारण तें समाजाच्या त्या वर्गांत मोडतात. समाजांतील सर्व वर्गांनीं अशीच यात्रावर्णनें लिहावीं म्हणजे त्या त्या मनुष्याच्या ऐपतीप्रमाणें ज्याला त्याला योग्य त्या सूचना व माहिती मिळूं शकते.

मी हिमालयांतील यात्रा केल्या त्यावेळी कांहीं फोटो घेतले होते. त्यांतील कांहीं फोटो श्री. साठये यांनीं मजकडे या पुस्तकांत घालण्यासाठीं मागितल्यावरून त्यांना मी आनंदानें ते फोटो दिले होते. त्यांनीं त्यांचा उपयोग या पुस्तकासाठीं केलेला आहे.

सदरहू पुस्तक मिरजेच्या स्नेहसंवर्धक संघातर्फे प्रसिद्ध होत आहे. ही संस्था येथे गेली चाळीस वर्षें आपलें सांस्कृतिक वाङमयात्मक कार्य करीत आहे व त्या संस्थेनें पुष्कळसे गद्य, पद्य ग्रंथ प्रकाशित केले आहेत. याच संस्थेनें श्री. साठये यानीं सात आठ वर्षांपूर्वी लिहिलेलें " संजीवनी हरण " या नांवाचें एक काव्य प्रकाशित केलें आहे श्री. साठये यांच्या या दुसऱ्या पुस्तकाचें प्रकाशन या संस्थेकडून होत आहे हें योग्यच आहे. अशींच चांगलीं प्रकाशनें या संस्थेमार्फत होवोत अशी इच्छा करून माझी प्रस्तावना पुरी करितों.

देवी भवन, मिरज
सौर श्रावण दि. ४ शके १८७९
२९ जुलै १९५७

**तात्यासाहेब**
**राजेसाहेब मिरज**
( सीनियर )

# देवदेखणी

## न विश्वमूर्तेरवधार्यते वपु :– कालिदास

जगांत देव आहे कीं नाहीं ? तो आहेच तर डोळसांना तो दिसावा पण दिसत नाहीं कसा ? तो दिसत नाहीं त्याअर्थीं तो जगांत नाहींच ! हीं प्रश्नोत्तरें तत्ववेत्त्यापुढें ठेवलीं तर तो म्हणेल कीं साधा मानवी डोळा या कामीं निर्णायक समजून चालतच नाहीं. जगाच्या अफाट विस्ताराच्या मानानें मानवी दृष्टि अगदींच कोती ठरते. तिच्या पल्ल्यांत सहजासहजीं देव यावा ही हांव पुरवायचीच तर विवेकाचा मुद्दरदर्शक वापरून तिला अवश्य ती विशालता आधीं कमावली पाहिजे. विवेकविमुख मानव केवढाहि वयोवृद्ध झाला तरी देवदेखणी-जोगें त्याचें वय होतच नाहीं. विवेकसंपन्नाच्या ज्ञानाची मात्र पहाट सौभाग्यवशात् अवचित फुटते. " वयसेचिया गांवा न येतां ! बाळपणींच सर्वज्ञता " ज्ञानबोला वरूं शकली ! ती किमया विवेकाचेंच फल होय. याच दृष्टिविकासामुळें ज्ञानदेवांना ' विश्वात्मक देव " दिसला. विश्वकल्याणाचे पसायदान मागण्याचा हक्क यांना लाभला तो विश्वात्मकदेव–दर्शीपणानेंच लाभला.

ही देवदेखणी प्राप्त होण्याच्या अनेक साधनापैकीं विश्वसंचार हें एक साधन आहे असें पटल्यामुळें प्राचीनकालापासून आमच्या पूर्वजांनीं आर्य तपोधनांनी ऋषिमुनीनीं तीर्थक्षेत्राच्या यात्रा करण्याची प्रथा पाडली आहे. प्रसिद्ध सनातन वैदिकधर्मसंस्थापक श्रीमद् आद्य शंकराचार्य तसेच महाराष्ट्रधर्माचे द्रष्टे राष्ट्रगुरु श्रीसमर्थ रामदास यांनीं आसेतुहिमाचल पदयात्रा करून स्वकार्य सिद्ध केलें. पुढे स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, महात्मा गांधीजी आचार्य विनोबाजी यांनींहि याच पदयात्रांनीं विश्वात्मकदेव पाहिला. देवदर्शनोत्सुकांना स्वतः भगवंतांनींच गीतेंत स्पष्ट निवेदिलें आहे कीं " रसो-हमप्सु, सरसामस्मि सागर , स्थावराणाम् हिमालय स्त्रोतसामस्मि जान्हवी ". देवभेटीचे

हे हमखास पत्ते नुसतेच मुखोद्गत करून उपयोग काय? सागरगत प्रभुदर्शन घेण्याला साधकानें भारताच्या दक्षिणदिगंतीची कन्याकुमारी वा धनुष्यकोटि गांठावी. तो उत्तर दिगंतीं पोचेल तरच त्याला देवात्मा हिमालय आणि पतितोद्धारक जान्हवी पाहतां येईल, एरवीं नाहीं. या देवदर्शनसुखाच्या अवीट गोडीचा शब्दगम्य परिचय वाचकांना करून देण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणजेच हें आसेतुहिमाचल पुस्तक होय.

१८ फेब्रुवारी ते १० ऑगष्ट १९५५ एवढ्या कालावधींत मला घडलेल्या आसेतुहिमाचल तीर्थक्षेत्रांचा व लहानमोठ्या शहरांचा परिचय हाच या ग्रंथाचा वर्ण्यविषय स्थूलमानानें ठरतो. यांत माझे व्यक्तिगत अनुभव उल्लेखतांना मला ठायीं ठायीं लाभली व वेळेवर टिपतां आली तेवढीच माहिती मी दिली आहे. अर्थात् हिला सर्वांगपूर्णता कशी असणार? कधीं स्थानिक भाषेचें माझें अज्ञान मला नडलें आहे. कधीं भेटल्या माहिती देणाराची माहितीच तुटपुंजी तर कधीं पुढल्या मुक्कामीं जाण्याची अटळ घाई व ओढ यामुळेंहि माहिती अपूर्णच राहणें संभवतें. कांहीं ठिकाणें वा व्यक्ति यांचीं मीं केलेलीं वर्णनें प्रसंगीं अतिरिक्त विस्तृत वा अति संकोचितहि वाटण्याचा संभव आहे. या दोषाबद्दल क्षमा मागतांना मला हेंहि अवश्य उल्लेखिलें पाहिजे कीं हीं सारींच वर्णनें सत्यकथितें आहेत मग वाचकाला सकृद् दर्शनीं तीं कल्पित कादंबरींतच ठीक शोभावींत अशीं क्वचित् अघटित, अत्यद्भुत, अविश्वसनीयप्रायहि का वाटेनात !

आजवर प्रसिद्ध झालें तें माझें बहुतेक वाङ्मय वृत्तबद्ध कवितात्मक आहे. हें आसेतुहिमाचलच मात्र समग्रपणें माझें पहिलेंच गद्य लिखाण आहे छंदोबद्ध काव्याला उबगून मुक्तच्छंदाच्या मार्गें आजचें मराठी वाचकांचें जग गद्याकडेच सारखें कलतें, झुकतें आहे. हीच प्रवृत्ति पूर्वी एकदां संस्कृत काव्याला कंटाळलेल्या वाचकांत मला वाटतें, बळावली असावी. ती महाकवि बाणभट्टांनीं ठीक ताडली. त्यांनीं

सहज छंदोविमुख होऊन आपली कादंबरी प्रकृतिनें काव्यात्मक असली तरी वाचकांना सादर केली गद्यशैलींतच ! प्रस्तुत आसेतुहिमाचलानें हाच " महाजनो येन गतः स पंथाः " अवलंबिला ठीकच !

या पुस्तकांत अनेक समर्पक संस्कृत सुभाषितें व अवतरणें ठायी ठायीं विखुरलीं आहेत. वाल्मिकी, कालिदास, भवभूति, भारवि, भर्तृहरि, जगन्नाथपंडित इत्यादींच्या संस्कृत काव्यांतील निवडक वेचेच मला माझ्या विद्यार्थिदशेंत अभ्यसावे लागले तसाच गीता-परिचयहि झाला. याच वाचनामुळें त्या गंगायमुना, तो अथांग सागर, तो उत्तुंगतम हिमालय, त्याची तीं हिमधवल गगनचुंबी शिखरें, तेथील तें दिव्य सृष्टिसौंदर्य कधीं एकदां पाहीन अशी मला अनिवार ओढ लागली. याच ओढीला भर दिली अनेक जुन्या, नव्या मराठी कवींनीं त्याच प्रमाणें प्रवासवर्णनपटु गद्यलेखकांनीं देखील ! हा आसेतुहिमाचल-दर्शनाचा प्रबल हव्यास मी तीन तपांवर पोसला, घोकला तेव्हां आतां कुठे तो सफल झाला !

यात्राकाळीं मी दैनंदिन टिप्पणी लिही. हेतु हाच कीं घरीं परतल्यावर जमल्यास कुठे मासिकावर्तमानपत्रांत कांहीं " चक्षुर्वैसत्यं " लिखाण प्रसिद्धावें वा स्नेह्यासोवत्यांत चालू गप्पांतून देतां येईल ती साधार सुसंबद्ध माहिती द्यावी. या यात्रेविषयीं तीन ठिकाणीं मला विस्तृत व्याख्यानें द्यावीं लागलीं. श्रोत्यापैकीं अनेक जाणत्यांनीं प्रसन्नमनें सुचविलें कीं हें प्रवासवृत्त मी अवश्य लिहावेंच. मी जनांचें ऐकलें तसाच माझ्या मनाचाहि मी विपुल विचार घेतला. पुढें सलग आठ महिने लेखणी रावबून हा ग्रंथ मी हातावेगळा केला. हीं हस्तलिखितें कांहीं रसिकापुढें मी स्वतःच वाचलीं तर कांहीं मित्रांनींच स्वतः तीं अधूनमधून चाळलीं. सर्वांनींच मत दिलें कीं ग्रंथ अवश्य छापवून प्रसिद्ध करावाच. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांतील संस्कृत भाषेचे प्राक्तन प्राध्यापक माझे कविमित्र श्री. ग. श्री. हुपरीकर ( सध्या वास्तव्य सातारा ) यांनीं तर सर्वापेक्षां एक पुढेंच पाऊल टाकलें.

नुमता समग्र ग्रंथ वाचूनच ते थांबले नाहीत, त्यांनीं आपला प्रांजल अभिप्राय लेखीं पाठवून ग्रंथमुद्रण अवश्य व्हावेंच म्हटलें.

ही प्रोत्साहक आकाशवाणी ऐकतां ऐकतां आपला हा ग्रंथ जमेल तसा छापावाच असें मलाहि वाटूं लागून मी आमच्या स्नेहसंवर्धक संघ, मिरज याचा कौल मागितला तो त्यानें आपला पुरस्कारच सादर केला. पुढें आमचे गुणज्ञ श्रीमंत राजे नारायणराव तात्यासाहेब मिरजकर यांनीं उचितसें कांहीं अर्थसाह्य दिलें. ही लग्न करूं पाहत्या निर्धन संन्याश्याच्या शिरवासूत्रापुरती तयारी झाली. प्रसिद्धिनवरीच्या दारी नवरदेव निघाला तो टिळा–माळा–मुद्रावांचून कसा धाडावा ? प्रस्तावनेचा साजरा टिळा आणि यात्राविषयक उपयुक्त छायाचित्रांच्या माळा हीं दोन्हीं प्रसाधनें आम्हांला उदारपणें पुरविलीं आमच्या श्रीमंत राजे तात्यासाहेबानींच ! ह्मीं दोन्हीं दानें देण्याचा अधिकार त्यांनीं अलीकडे केलेल्या आसेतुहिमालय यात्रांनीं मिळवून आमच्यासाठीं आपल्या संग्रहीं आधींच ठेवला होता, तो सुफळ झाला ! पुढें मुद्राविधान व बहिरंगी पेहराव याची व्यवस्था खास आपुलकीनें आमचे प्रसिद्ध मुद्रणपटु मित्र श्री. नीळकंठराव विश्वनाथ महाबळ व त्यांच्या गजानन मुद्रणालयांतील कलावंत सहकारी यांनीं उत्तमपणें केली. अशापरी अनेकाहातीं सजवलेला हा नवरदेव ग्रंथ प्रसिद्धिनवरीच्या मंडपाकडे निघाला आहे.

देवदर्शनार्थ मांडलेल्या या यात्रेंत आमची भगवन्निष्ठा कसाला लावून पाहण्यासाठींच बहुधा मला वाटतें, आम्हांला उदंड विघ्नें विघ्नकर्ते तसेच विघ्नहर्तेहि भेटले. वाहनोवाहनीं सामानासुद्धां पुनः पुनः चढणें, उतरणें, झोपमोड, उपासमार, दुःसह ऊन्ह, थंडी, पाऊस दुर्गम पहाड, दरीखोरीं, नद्यानाले, भयाण अरण्यें, दुखणींबाणीं आणि चोर दरोडेखोर हीं विविध विघ्नें आडवीं आलीं, आम्हांला झोंबलीं पण त्यांची घटका भरतांच देवदयेनें त्यांचा परिहार झाला. सकृद्–दर्शनीं यांतील कांहीं उग्र कांहीं उग्रतर वाटलीं पण पुरेसा धीर करून त्यांची

यथोपचारीं आराधना करितांच तीं क्रमशः सौम्य, सौम्यतर ठरलीं, व आलीं तशींच मागें हटलींहि ! तीं उग्र वा सौम्य कशींहि झालीं तरी खास देवरूपेंच मानून आम्हीं वंदिलीं. आम्हांला विघ्नहर्ते व उपकारकर्ते भेटले त्यांत कांहीं मानव तसेच मानवेतरहि भेटले. कसेहि ते असले तरी त्यांच्यांतील दैवीसंपदेमुळेंच ते आम्हांला वंद्य होत. ही यात्रा पार पाडतांना आमच्यावर त्यांचे झाले तसेच हा ग्रंथ प्रसिद्धि-मार्गीं आणितांना ज्या ज्या कोणाचे आम्हांवर सानमोठे उपकार झाले त्या सर्वांचे मनःपूर्वक इथें आभार मानणें मी माझें कर्तव्य मानतों.

मला उपयुक्त संदर्भग्रंथ म्हणून पुण्याच्या "एकता" मासिकातील " हिमालय दर्शन "– लेखमालेबद्दल श्री शंकर सखाराम दाते, पुणे, व " चारीधामाची यात्रा " पुस्तकाचे कर्ते श्रीमंत माधवराव भवानराव प्रतिनिधि संस्थान औंध ( सातारा ) राजकुमार, पुणे, या उभयतांचे वंदनपूर्वक मी आभार मानतों. माझीं व्याख्यानें ऐकून वा हस्तलिखितें वाचून किंवा चाळूनहि या ग्रंथलेखनीं मला ज्यांनीं प्रोत्साहिलें, प्रस्तावना व छायाचित्रें दिलीं, ज्यांनीं शक्य तें द्रव्यसाह्य दिलें, ज्यांनीं मुद्रणाविषयीं मनःपूर्वक काळजी वाहिली, ज्यांनीं कलात्मक बांधणीनें हीं पुस्तकें शक्य तों स्वरक्षणक्षम केलीं त्या सर्वांचा मी मनापासून आभारी आहें.

आभारवाचनाचा हा गोड घांस नामोच्चारापुरता मी इथेंच आवरलेला बरा म्हटलें तरी आणखी कांहीं अपरिहार्य ते नामोल्लेख करणेंच मला भाग आहे. आमचा स्नेहसंवर्धक संघ, मिरज याचा महिमा कांही वेगळाच आहे. आपल्या घटकांची म्हणजे आमचीं वाङ्मयापत्त्यें त्यानें गेलीं चाळीस वर्षें आपल्या अंगीं खांदीं वत्सवत्सल पित्याच्या नात्यानें मिरवलीं, खेळवलीं व हातीं धरून जगाच्या परिचयाचीं केलीं. प्रस्तुत अपत्याचा खेळ '**आसेतुहिमाचल**' विस्तरलेला पाहून त्या संघानें त्याचें आगळेंच कौतुक केलें. मग त्याचे आभार मानतांना मी त्याचा नामोल्लेख गाळून चालेल कां ?

आमचे सहप्रवासी जी नागपूरकर दंपती तिचेहि आभार मी मादर मानतों या उभयतांनीं आमच्यावर भार्तृनिर्विशेष प्रेम केलें, अगणित उपकार केले. खेद इतकाच वाटतो कीं या क्रौचमिथुनांतील 'एक' श्रीयुत सदाशिवराव अण्णासाहेब फडणीस यांना कठोर कालनिपादानें आपल्या विषारी बाणानें नुकतेंच टिपून नेलें ! आमच्या प्रेमळ भगिनी श्रीमती उमाबाई फडणीस आपल्या पतिदेवाच्या प्रेमाच्या छत्राला कायमच्या आंचवल्या ! परंपरया आमचेंहि तसलेंच नुकसान झालें तें कधींच भरून येणार नाहीं. एकमेकांच्या सोवतीनें या पति-पत्नींना चारीधामें घडलीं तशींच आम्हांलाहि घडलीं हेंहि या क्षण-भंगुर मानवी जीवनांत कांहीं थोडें समाधानास्पद नव्हे ! श्रीमती फडणीसांनीं जगरहाटीकडे पाहून आपलें उर्वरित आयुष्य श्री सदाशिव-चिंतनीं वेचावें अशीच प्रेरणा देव त्यांना देवो. प्रस्तुत "आसेतु-हिमाचल" ग्रंथ पाहून पुनश्च हिमालयदर्शनमुख श्री अण्णासाहेबांना झालेंच असतें पण –

आतां चि. योगाताई व चि गंगुताई या माझ्या दोन्ही बहिणींचा मी आभारी आहें. पहिलीनें मिरज ते कन्याकुमारी व तिथून परत मिरजेपर्यंत आम्हांला सोबत केली तर दुसरीनें मुंबई ते बदरीनारायण व तिथून परत मुंबईपर्यंत आमची पाठ राखली. या माझ्या आते-बहिणी वयानें माझ्याहून दोघीहि लहान असल्या तरी त्यांनीं माझी व आपल्या भावजयेची काळजी आईनें लेकराची घ्यावी तशीच निरलसपणें सर्वत्र घेतली यांत बिलकुल अतिशयोक्ति नाहीं.

आतां आभारार्ह व्यक्ति राहिली एकच माझी सहधर्मचारिणी सौभाग्यवती सत्यभामा या प्रवासांत आरंभापासून इतिश्रीपर्यंत तिनेंच माझी व्यक्तिची सुखसोय व काळजी सर्वपरी वाहिली. अवघा हा प्रवासच नव्हे आजवरचा माझा संसार व आयुष्यक्रम तिनेंच शक्य तितक्या तत्परपणें सुखमय केला आहे. तिचे आभार मी मानणें-मला माहित आहे कीं – तिला मुळींच रुचणार नाहीं पण माझें

कर्तव्य मीहि- जपलेंच पाहिजे ! बाकी उजवीं डावीं अंगें म्हटलीं तरी तीं मिळूनच पुरा पुरुषदेह होतो म्हणा.

शेवटीं या आभारवाचनांत इथवर मला आठवले व उल्लेखवले त्यांचा व चुकून विस्मृतिवशात् जे कदाचित् अनुल्लिखित राहिले असतील त्या त्या सर्व उपकर्त्यांचा मी अत्यंत आभारी आहें. मानवी स्वभावसुलभ विस्मृतिबद्दल वा कळत न कळतहि माझ्या-हातीं झाल्या सानमोठ्या अपराधाबद्दल त्या विश्वात्मक देवापाशीं पदर पदरून नम्रपणें मी मागतों कीं " तत्सर्वं क्षम्यताम् देव, प्रसीद परमेश्वर ! " – इतिशम्.

' राधागोविंदधाम ' मिरज
कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १८७९
हेमलंबीनाम संवत्सरे, दिनांक
२३ ऑक्टोबर १९५७

सर्वांचा कृपाभिलाषी
**विनायक गोविंद साठये.**

# स्नेहसंवर्धक संघ मिरजकडून पुरस्कार

# वाङ्मयालि.

हा स्नेहसंवर्धक संघ, मिरज गेली चाळीस वर्षे जनता-जनार्दनाची सेवा वाङ्मय-पुष्पद्वारा निष्ठेने करीत आला आहे. जनता-जनार्दनाच्या कृपेनें संघानें आपल्या अंगणांत मधून मधून बहरत्या वाग्वल्लरीचीं पुष्पें जनताजनार्दनाला वाहिलीं आहेत. तीं त्यानें स्वीकारलीं आहेत, गोड करून घेतलीं आहेत.

त्या अकरा पुष्पांचें वारावें भावंड हें "**आसेतुहिमाचल**" त्या जनताजनार्दनाच्या चरणीं आज सादर करितांना या संघाला कोण आनंद झाला आहे म्हणून सांगावा ! हें वाक्पुष्प संपादण्यासाठीं आमचे कवि श्री. विनायक गोविंद साठ्ये यांनीं दक्षिणोत्तर भारताची आपादमस्तक यात्रा केली. या सहा महिन्यांत त्यांनीं कितीतरी कष्ट भोगले तसेंच मनमुराद दृष्टिसुखहि लुटलें तें इतकें कीं त्या आनंदातिशयाच्या भगवद्दर्शनानें, मागें झालेल्या सर्वच कष्टांचा त्यांना विसर पडला. आपले अनुभव स्नेह्यासोबत्यांना काव्यरूपानें निवेदण्याची त्यांची नेहमीची प्रवृत्ति आतांहि जागृत झाली. पण वर्ण्यविषयाच्या अलोट उचंबळत्या मनोजव गंगौघानें वेगळाच चमत्कार मांडला. त्यानें श्री. साठ्ये यांचे कविस्वभावसुलभ श्लोकवृत्तांचे पाटबंधारे आणि तटबंध सहज झुगारून देऊन गद्यशैलीचें मोकळें मैदानच आपल्या यथेष्ट संचाराला भलें सोयीचें म्हणून निवडलें !

असें हें "आसेतुहिमाचल" एक आमूलाग्र गद्यप्रधान लिखाण झालें असलें तरी "मूळ स्वभाव जाईना। त्याचें येळकोट राहिना" असें जे तुकोबारायांनीं म्हटलें आहे तेंच येथेहि खरें ठरलेलें रसिकांना पानोपानीं आढळेल. श्री. साठ्ये यांची अभिजात कविता या गद्यवेषांतही केवळ डोकावतेच नव्हे तर उठून दिसते.

यात्रिक जीवनांत " नवी विटी नवें राज्य " नित्यच चालतें. झाल्या सुखसोयीची विटी वांटचाला आली तेव्हां ध्यानींमनींही कधीं नसलेल्या दक्षिण दिगंतींच्या कुट्रलिम् येथे श्री. साठ्ये यांना नुसता धारास्नानविहारच नव्हे तर श्री. रामैय्यरासारख्या सर्वस्वी अनोळखी परप्रांतीयाच्या घरीं त्याच्याच हातीं " न भूतो न भविष्यति " असा पाहुणचार लाभला ! पुढें उत्तराखंडीं घुत्तुचट्टीशेजारीं श्री बदरी-केदारच्या मार्गीं श्री. साठ्ये यांच्यावर उलटल्या नव्या राज्यामुळें सौ. सत्यभामाबाईंना अपमृत्युनें आपलें ओझरतें दर्शन दिलें, तोंच त्याला आपल्या हातीं होऊं घातलेल्या अनुचिताची जणु जाणीव झाली ! आणि विचाऱ्यानें तत्काळ माघार खालली ! अशा सुख-दुःखाच्या सौम्य तशाच उग्र पण मर्मग्राही प्रसंगांचीं यथातथ्य शब्द-चित्रें अतीव हृदयंगमपणें रेखलेलीं या ग्रंथांत कितींतरी आहेत. अस्तु

आतां आपल्या भरतभूमीचा जनताजनार्दन हाच सार्वभौम राजाधिराज झाला आहे. हा ग्रंथ त्याच्याच उदार आश्रयाला सुतराम् पात्र ठरो हीच या बद्धांजलीची कळकळीची प्रार्थना.

शुभं भवतु.

दिनांक २३ आक्टोबर १९५७
स्नेहसंवर्धक संघ कार्यालय
मिरज (दक्षिण सातारा)

भगवत्कृपाभिलाषी
**पुंडलीकजी कातगडे**
प्रमुख, स्नेहसंवर्धक संघ, मिरज

# आसेतुहिमाचल.

## पूर्वार्ध :-- मिरज ते कन्याकुमारी व परत.

# अनुक्रमणिका


| खंड | | | पृष्ठें |
|---|---|---|---|
| पहिला :– मिरज ते गोकर्णमहाबळेश्वर | ... | | १–१६ |
| दुसरा :– हरिहर ते शृंगेरी | .... | ... | १७–३२ |
| तिसरा :– म्हैसुर व आसमंत | ... | ... | ३२–६२ |
| चवथा :– त्रिवेंद्रम् ते कन्याकुमारी | | ... | ६२–८८ |
| पांचवा :– शुचींद्रम् ते मदुरा | ... | ... | ८८–९१ |
| सहावा :– श्रीरामेश्वरम् | ... | ... | ९१–१२२ |
| सातवा :– श्रीरंगम् ते चिदंबरम् | .. | ... | १२२–१३९ |
| आठवा :- चिंगलपुट ते मद्रास | . | ... | १४०–१५४ |
| नववा :– मद्रास ते मंत्रालयम्रोड | | ... | १५४–१८१ |
| दहावा :– मंत्रालयम्रोड ते पंढरपूर–मिरज | | | १८१–२०४ |

# आरेतुहिमाचल

## उत्तरार्ध :- मिरज ते बदरीनारायण व परत.

## अनुक्रमणिका


| खंड | | | पृष्ठें |
|---|---|---|---|
| पहिला :- मिरज ते मुंबई | ... | .... | १-१३ |
| दुसरा :- मुंबई ते दिल्ली | ... | .... | १४-२१ |
| तिसरा :- दिल्ली ते हरिद्वार | ... | .. | २१-४८ |
| चवथा :- हरिद्वार ते धरासू | ... | .... | ४९-६४ |
| पांचवा :- धरासू ते जमनोत्री | . | .. | ६५-९१ |
| सहावा :- जमनोत्री ते गंगोत्री | .... | .... | ९२-१२५ |
| सातवा :- गंगोत्री ते केदारनाथ | | .... | १२५-१७४ |
| आठवा :- केदारनाथ ते बदरीनाथ | | .... | १७४-२१८ |
| नववा :- बदरीनाथ ते पिप्पलकोटि | | .... | २१९-२२८ |
| दहावा :- पिप्पलकोटि ते हरिद्वार | | .... | २२८-२३३ |
| अकरावा :- हरिद्वार ते दिल्ली | ... | .... | २३३-२३९ |
| बारावा :- मथुरा ते आग्रा | | .... | २३९-२४५ |
| तेरावा :- आग्रा ते प्रयाग | ... | .... | २४५-२५१ |
| चौदावा :- बनारस ते नासिक | | .... | २५२-२५४ |
| पंधरावा :- नासिक ते मुंबई | ... | .... | २५५-२७२ |
| सोळावा :- मुंबई ते पुणें व मिरज | | .... | २७२-२७८ |


टीप :- आठव्या खंडाची नोंद योग्य ठिकाणी झालेली नाहीं. ती चूक वाचकानी पृष्ठ १७४ वर करून घ्यावी वा आहे असें मानून चालावें.

# आसेतुहिमाचल

## — पूर्वार्ध —

## मिरज ते कन्याकुमारी व परत.

### खंड पहिला :- मिरज ते गोकर्ण महाबळेश्वर.

## प्रस्थान

इ. स. १९५१ त सौभाग्यवतीसह मी त्रिस्थळी व लक्ष्मण झुल्या-पर्यंत उत्तर दिशेच्या यात्रा उरकल्या व तेव्हांच संकल्प केला कीं मी सेवानिवृत्त होतांच शक्य तितक्या लौकर श्रीरामेश्वर यात्रेच्या निमित्तें दक्षिण भारतीय अनेक क्षेत्रें तीर्थें करायचीं. १५ ऑगष्ट १९५४ ला मी नोकरींतून मुक्त झालों. त्याच सुमारें नवीन स्टँडर्ड टूर तिकिटें मिळण्याच्या नाना योजना वर्तमानपत्री फडकूं लागल्या म्हणून मी सदर्न रेल्वे हुबळी व मद्रास या दोन्ही अधिकारी वर्गाकडे दि. ३ फेब्रु. ५५ ला अर्ज केले. उत्तराची पुरेशी वाट पाहून मी पुन्हां लिहिलें तरी कुणाचेंच कांहीं उत्तर नाहीं. तिस-यांदा लिहिलें तेव्हां मद्रास जागी झाली. तिनें सांगितलें कीं तिकिट हवें तर मिरजे-पासून तें मिळणार नाहीं; तें मद्रासपासूनच मिळेल. आरंभींच वाज-लेल्या या नकार घंटेनें मी कांहींसा अस्वस्थ झालों, पण इतरत्र चौकशी करून लाभल्या माहितीनें मी चांगलाच चकित झालों; हवें होतें तेंच तिकिट मिरजेतील सेंट्रल रेल्वे स्टेशनपासूनच मिळालें ! असा हा "काखेंत कळसा आणि गांवाला वळसा" प्रकार चमत्कारिक दिसला तरी मला तोहि सुफळच झाला. आमची आतेबहीण चि. योगाताई म्हणजेच श्रीमती यशोदाबाई चिन्तामणभट केळकर ही आम्हासोबत

यात्रेला येण्याची ठरली. तिकिटें मिळण्याकडून इथवर झाला तो खोळंबा झाला नसता तर आम्ही उभयता पंधरा दिवस तरी आधीं यात्रेला निघूं शकलों असतो. घरगुती अडचणीमुळें ताईला मात्र आम्हा-सोबत तेव्हां निघतांच आलें नसतें. पण आज वेगळीच मुरड पडली.

दिनांक १७ फेब्रुवारीच्या पहाटेची गोष्ट. ताईचे जावई श्री. नारायणराव आपटे अंघोळीसाठीं गांवाबाहेरच्या एका विहिरीला जातांना मला अवचित भेटले. मी सहज शब्द टाकला तो त्यांनीं शिरसा झेलला. इतकेंच नव्हे तर ते वरती म्हणाले कीं अंघोळीहून परतलों कीं जरूर त्या पैशांचीहि सोय करून देतो. तिकिटाबाबतच्या पहिल्या नकारावर हा अनपेक्षित रुकार ऐकून ईश्वरी सूत्राच्या अगम्य हालचालीचें तेव्हां मोठें कौतुक वाटलें. दिनांक १८ फेब्रुवारी सुप्रभातीं मी, माझी पत्नी सौ. सत्यभामा व आतेबहीण चि. योगाताई असें त्रिकूट टांग्यांतून "ब्राम्हे मुहूर्ते" मिरज सदर्न रेल्वे स्टेशनकडे निघालों.

पुण्याहून वेळगांवीं जाणारी गाडी त्या सूर्योदयीं भली ४० मिनिटें उशीरानें मिरजेस पोचली. मला वाटलें न जाणों, आमच्यासारख्या दुर्मिळ त्रिकूटाच्या संगतिलाभाच्या लोभानेंच बिचारीनें बळें वेळ लावला! तिनें आम्हांसहित मिरज सोडली साडेआठाला. आम्हांला गाडींत बसवून निरोप देण्यासाठीं मिरज स्टेशनवर आमचा थोरला मुलगा चि. तात्या, जावई चि. नाना आपटे व मित्रोत्तम व्यंकाबा म्हैसाळकर मास्तर असे तिघे आले होते. आम्ही चिर संकल्पिलेल्या यात्रेला निघालों होतों म्हणून आमचीं सर्वांचींच मनें एकपरी उल्लसित होतीं तशींच स्वजनांचा विरह आतां २।३ महिने तरी खास भोगणें भाग म्हणून तीं खेदजडहि झालीं होतीं. सौभाग्यवती आणि ताई दोघींचेच काय माझेहि डोळे तेव्हां पाणावले. बेळगांवकडे वळवलेल्या आपल्या तोंडीं आगगाडीनें एक भला मोठा घुराचा काळाभोर लोट झुगारला. तिचें अनुकरणच जसें आम्ही सर्वांनींच तत्काळ करून अंतर्यामीचें चिन्तेचें ठाणें दूर लोटून दिलें. कांहींशा उसन्याच स्मित मुद्रांनीं आम्ही आमच्या निरोपांची दे घे केली आणि गाडी सुटली.

बेळगांवपर्यंतचा ताईचा प्रवास मागें एकदां झाला होता. माझा तो अनेकदां झाला होता. सौभाग्यवतीला मात्र तो भाग अगदींच नवा होता. अपरिचित असें कांहीं दिसलें कीं तिचे प्रश्न पुनः पुनः होऊं लागले. आरंभीं आरंभीं तिच्या शंकासमाधानाचा मक्ता ताईकडे होता. पुढें घटप्रभेचें नवें धरण व त्या धरणानजिकच्या रुग्णालयाची नवी वास्तु दिसतांच माहिती घेण्यासाठीं सौभाग्यवती माझ्याकडे वळली. तिला धरण म्हणजे काय असतें याची नीटशी कल्पनाच नव्हतीं. "हें तळें कसलें ?" म्हणून तिनें प्रश्न केला. तितक्यांतच तिच्या ध्यानीं आलें कीं तळ्याची टेवण वेगळी असते. तळ्यांतून पाणी बाहेर सोडलेलें तिनें आजच प्रथम पाहिलें. कालवा म्हणतात तो कसा असतो ही माहिती तिला नवीच मिळाली. तिनें नद्या, ओढे, नाले विपुल पाहिले होते. त्यांच्या ठेवणीशीं कालव्याची ठेवण तिला तितकीशी मिळती आढळली नाहीं. म्हणून तिचें शंकासमाधान मला करावें लागलें तिला पटलें कीं मानवी करामत कांहीं वेगळीच असूं शकते. मानवाच्या हातचें केवळ खेळणें होण्याची पाळी कधीं कधीं निसर्गावरहि येते.

गोकाक स्टेशन सुटलें नि सौभाग्यवतीला एक नवीनच नवल जाणवूं लागलें. आपली मराठी बोली कानावर पडणें विरळ विरळ होऊं लागलें. कानडीची पक्कड कानावर अधिकाधिक बसूं पाहूं लागली. उतारू मंडळींतले पुरुष मधून मधून मराठी बोलतांना ऐकूं येत पण बायका व मुलेंबाळें यांच्या जिव्हाग्रीं बहुधा नाचे कानडी शारदाच. त्या बोलींत वहुधा मार्दवाला मज्जाव आणि कर्कशतेला बडेजाव एवढा कसा लाभला आहे काहीं उलगडत नाहीं !

बेळगांवीं गाडी पोचली तों साडेबारा झाले. आम्ही उतरलों तोंच स्टेशनवर गोकर्णकर उपाध्याय वे. शा. संपन्न जोगळेकरजी आम्हाला भेटले नि म्हणाले कीं गोकर्णीं जाणारी स्पेशल बस आम्हांला आणखी एक दीड तासांतच मिळेल, तशी तयारी असूं द्या निघण्याची ! या वार्तेनें मिरजेहून निघतांना आम्ही केलेल्या सगळ्याच बेताला गहजच

अनपेक्षित मुरड बसली. चि. विष्णुकडे एक सबंध दिवस राहून बेळगांवीं प्रेक्षणीय तें तें पाहून, पुढील यात्रेसाठीं उपयुक्त, कंदील, बॅटरी व मसाले वगैरे खरीदून मगच आम्ही बेळगांव सोडणार होतों ! मी स्वत:च तेवढा तरातरा बेळगांवातून मिरवून आलों. नाहीं चि. विष्णु भेटला तसेच ते पुंडलीकजीही. एक गेले होते अज्ऱ्यास सरकारी कामावर तर दुसरे त्यांच्या त्या हुदली आश्रमाकडे ! दीड तासाभरांत स्टेशनवर परतलों तो गोकर्णास जाणारी स्पेशल बस आम्हाला लाभली. भाडें दरमाणसीं आठ रुपये पडले. "आतां निघाली", 'आतां निघणारच' म्हणतां म्हणतां बाई बेळगांवाबाहेर प्रत्यक्ष निघे तों साडेचार वाजले ! गाडींत बसलेल्या उतारूंनीं "हर हर महादेव" असा मोठा प्रचंड घोष केला. त्याला त्या गाडीच्या खोलत्या ब्रेकांनीं सहृदयपणें जसें कांहीं प्रत्युत्तरच दिलें नि गाडी चालूं लागली.

बेळगांव ते गोकर्ण रस्ता बहुतेक सारा जंगलांतूनच गेला आहे. सध्या तो सिमेंट कॉंक्रिटचा केला जात असल्यानें त्याला समान्तर असा कामचलावू केलेला रस्ताहि जंगला-जंगलांतूनच काढला आहे. मोटारींची येजा उदंड असल्यामुळें हा सारा च रस्ता सारखा धूळफेकीत रमला आहे जसा भासतो. आपल्याला जाणूनबुजून तुडविणारांच्या अंगावर पददलितांनीं चिडून जाऊन उडविता येईल तितकी धूळ उडवावी व कडाडून सूड घ्यावा तसा हा जंगली रस्ता त्या मोटारींच्या अंगीं व तदंतरंगस्थ आम्हांवरही सपाटून धूळ उडवून घेत होता ! बेळगांव सोडल्या घटकेपासूनच आम्हाला जंगलांत गांवें आणि गांवांत जंगलें कितीं तरी भेटलीं ! वेगळ्या भाषेंत हेंच म्हणायचें तर म्हणावें लागेल कीं गांवाची हद्द कोठें सरली व जंगलाची सुरवात कुठें झाली हें झाडीमुळें ओळखूंच यायचें नाहीं.

आमच्या संचाराला मोटारीचें आणि इंग्रजी भाषेचें पाठबळ होतें तसेंच तें कानडीचेंहि थोडें तरी असतें तर किती बरें झालें असतें खचित ! आम्हांला कानडीचें वांवडें तर तत्प्रांतीयांचें मराठीशीं तसुमरही सूत जमण्याचेंच भ्रांत ! आम्ही कोणास कांहीं विचारूं

जावें वा आम्हांला कोणी कांहीं विचारूं पहावें तों उभयांच्याहि तोंडांना जशीं अचानक आपोआप भलीं मोठीं कुलुपेंच बसायचीं ! विचाराच्या व्यक्तीकरणाकामीं दोघांच्याहि मनांचा असहायपणें झालेला कोंडमारा चेहऱ्यावर तत्काळ प्रतिबिंबे. असहायतेचा मुका मार दुःसह झाला तरी तो खावाच लागे. बेळगांवपावेतो मराठी आणि कानडी जशा सख्ख्या बहिणीच एकोप्यानें नांदल्या. पण गोकर्णाचा शेजार भिडूं लागला तसतशी एखादा कानमंत्र मिळाल्यासारखी कानडी अधिकाधिक बळावूं लागली. मराठीचें तिथवर चालतें पाऊल अधू अवू होऊन वारंवार आडूं आडखळूं लागलें.

खानापूर, हल्याळ, यल्लापूर इत्यादि वाटेंत भेटणाऱ्या गांवोगांवीं आमची गाडी विसांवली कीं तिच्या आसपास हिंडणारे फळवाले विक्रेते गर्जूं लागत "बेक बाळे हण्गु ?" (पाहिजेत का पिकलीं केळीं ?) विक्रीसाठीं आणलेलीं केळीं टोपल्यामधून उघडच दिसत. तीं विकत घेण्यासाठीं आम्ही सरसावावें तों आम्हांला माघार घ्यावीच लागे. काय आम्हांला हवें वा काय नको हें सुचविणार कसें हेंच कोडें आडवें येई. मग युक्ति सुचून दोन आण्याचें एक नाणें उजव्या हातीं पुढें करावें व चार केळ्यांवर तो हात ठेवावा. तो गांवढा केळींविक्या आमचा हेतु ओळखतां येऊन मंद स्मित करी; ती दुआणी तो आपल्या हातीं घेऊन चार केळीं आमच्या हातीं ठेवी एकदाचा ! कधीं कधीं तीनच केळ्यांची किंमत दोन आणे पडे कीं बोटांच्या नाचावरच काम भागवावें लागे. विक्रेता पुरुष असला तर व्यवहार लवकर आटोपे. स्त्री विक्रेत्यांच्या वेळीं बराच वेळ दवडे नि कधीं कधीं त्यांची समजूतच न पटूं शकल्यानें व्यवहारच आडे. तोंडासमोर एकमेकांचीं तोंडें अमूनही भिन्न भाषकत्वामुळें तीं परस्पर विरुद्ध असल्याप्रमाणेंच फळ पदरीं पडे!

आधींच ती सडक जंगलांतून जाणारी तात्पुरती होती. त्यांत आज वाहनांची वर्दळ अधिकच. वाढण्याला यात्रेकरूंची वाहतूक हें जसें एक कारण झालें होतें तसेंच जंगलतोडीचा माल वाहून नेण्याचें काम शेकडों बैलगाड्यांतून चालूं होतें हें दुसरें कारण होतें. अधूनमधून जंगला-

मुळें हा रस्ता इतका अरुंद होई कीं केवळ एकच गाडीला जाण्याची सवड राही. यामुळें पुढचांतून आलेल्या गाडीला वाट करून दिल्या-शिवाय आमच्या मोटारीला पुढें चाल अशक्य होई. साहजिकच मोटारीला पुनः पुनः खोळंबावें लागे. अशी ठायीं ठायीं खोळंबत व चालचालत चाललेल्या आमच्या मोटारीचें ऐश्वर्य कांहीं थोडें नव्हतें. तिला ड्रायव्हर क्लीनर सुद्धां पंचावन्न स्वारींची वाहतूक करण्याची सरकारी आज्ञा होती. पण संततिनियमनाचें अन्यत्र फैलावलेलें खूळ या गाडीच्या स्वार्थी प्रवृत्तिला मानवणार होतें थोडेंच ! गांधारीनें आपल्या पोटीं शंभर कौरव सामावून घेतले होते तसेच तिनें बासष्ट चौसष्ठ लहान मोठे उतारु बेळगांवपासूनच खेचाखेचीनें पण सुखरूपपणें वाहून इथवर आणले होते. तिनें शिरसा धारण केलेल्या सामानसुमानाच्या बोजानेंहि आपली ठराविक इयत्ता केव्हांच ओलांडली होती. अशी माणसांनीं आणि ओझ्यानेंही ओतप्रोत लादलादली होती तरी बाईचा पराक्रम मुळींच उणा पडला नव्हता अवघ्या आठ-साडेआठ तासांत बेळगांव ते गोकर्ण महाबळेश्वर म्हणजे सुमारें ९० मैलांचें अंतर तोडतांना तिनें बेडरपणें कैक दरीं, खोरीं, ओढेनाले, डोंगर कंगर धिम्या पावलीं पादाक्रांत केले होते. आज माघ वद्य एकादशीच्या वाढत्या काळोख्या रात्रींहि तिनें जंगलामार्गें जंगलें कांटून जातांना एखाद्या काळजीखोर गरोदर मातेनें पोटीच्या गर्भाला जपण्यांत सहन करावेत तसले कष्ट आणि वहावी तसली काळजी उतारूंच्या विषयीं अखंडपणें खरीच वाहिली होती. ऐन मध्यरात्रीच्या अवसरीं ही आमची गाडी गोकर्ण महाबळेश्वरीं मोटार थांब्यावर येऊन पोहोचली. तिला थांबवतांना दाबल्या जाणाऱ्या ब्रेकांचा कर्णकठोर करकराट झाला. प्रसूतिस्थानीं पोंचल्या गर्भवतीनें दिल्या मर्मभेदक वेणांचीच तेव्हां मला जाणीव झाली. प्रसूतेपोटीं कन्यापुत्रांची सरमिसळ संतति निपजावी तसे त्या गाडीपोटीं इतका वेळ चिणून चोंदून बसलेले स्त्रीपुरुष उतारू लगबगीनें बाहेर पडले एकदांचे ! नवजात अर्भकानें "टयाहां, टयाहां" करावें तसाच त्या उतारूंनीं मोठा गजर केला "हर हर महादेव !" गर्भ-वासातून लाभल्या मुक्तीचा कृतज्ञतापूर्वक होणारा पहिला उद्‌गार याहून वेगळा थोडाच सुचणार ?

मोटार थांबतांच तिच्या माथां लादलेलें सामान खालीं नीटपणें उतरवून ज्याचें त्यानें ओळखून ताब्यांत घेणें महत्वाचें तितकेंच जिकिरीचेंहि ठरलें. त्या मोटार थांब्याच्या प्रसाराच्या मानानें तिथे केलेली दिवाबत्तीची सोय अगदींच तोकडी ठरली. खिशांतील विद्युज्ज्योतींच्या तरल आणि परिमित प्रकाशाच्या मदतीनें आपापलें सामान कसें बसें ओळखून घेणें उतारूंना मोठें प्रयासाचें काम ठरलें. उपाध्याय जोगळेकर बंधुपैकीं एकजण आम्हा यात्रेकरूंची वाट पहात त्या थांब्यावर आधीच उभे आढळले. त्यानीं आमची विचारपूस केली. त्यांच्याच घरीं उतरून राहूनच आम्ही क्षेत्रांतील आपला कार्यभाग त्यांच्याकरवींच करविण्याचा ठरलेला आमचा मनोदय आम्ही त्यांना तत्काळ कळविला. त्यांनीं दोन विश्वासुक हमाल आम्हाला ठरवून दिले. त्यासोबत जोगळेकरांच्या वाडयाकडे आम्ही तिघे चालूं लागलों.

आम्ही यात्रेकरू म्हणून गोकर्णी आलों होतों. तेथे असे तों आमच्यावर महामारीचें प्राणसंकट ओढवूंच नये म्हणून जपणारें महामारीनिवारक आरोग्यमंडळाचें पथक आम्हाला आमच्या वाटेवर सामोरेंच = जसें आम्ही निघालों असतांना आलें ! त्या पथकांतील एका कारकुनानें चटकन् पुढें होऊन आमचीं तिघांचीं नांवें लगबग टिपलीं- दुसऱ्या एका तरुणानें माझा डावा दंड त्यावरील हातोपा पुरेसा मागें सारसारून उघडा केला व तत्क्षण त्यांत महामारी–प्रतिबंधक लस टोंचूनहि दिली ! सौभाग्यवतीच्या बाबतींतही तितक्याच झटपटीनें तोच प्रकार उरकला गेला. त्यांनीं "टोचूं ना टोचूं" वगैरे पुसलेंहि नाहीं, तसेंच आम्हीदेखील 'हवें नको' म्हणायची सवड घेतलीच नाहीं ! या साऱ्या घाईंत आणि घोळांत उभ्या असलेल्या आमच्या ताईला टोंचून न घेतांहि लस टोचून घेतल्याचा पास तेवढा सहज पदरांत पडला झालें ! सरकारी कारभाराच्या सरधोपट कचक्यांत "आंधळें दळतें आणि कुत्रें पीठ खातें" म्हणतात तें हेंच ! आम्हा दोघांना टोचलेलें पाहून मनांतल्या मनांत पार घाबरून गेलेल्या ताईनें आपण होऊन आपला दंड उघडा केला होता. तो टोचलेला होता वा नव्हता हें न पाहतांहि त्या दंडावर

चटकन् आयोडीनचा वोळा लावला गेला. "असें कसें?" हा पेच ताईच्या तोंडीं चिन्हित झाला पण तिनें तो उद्‌गार मात्र होऊं दिला नाहीं. शिगावर बेतलेलें शेपटावरच भागलें म्हणून नेत्रसंकेतांनीं आम्ही एकमेकाला हलकेंच इशारे दिले. हूं कीं चूं न करितां, नव्हे पोटांतून ओठावरी आलेलें हांसू ओठींच आवरून, लपवून, आपापल्या वाटा लगबग आम्ही थेट सुधारल्या!

अजमासें मैल दीड मैलांचें अंतर अनेक वळणें वांकें घेत घेत आम्ही वे. शा. जोगळेकरांचे महाद्वारीं पोंचून उभे राहिलों. एका वृद्ध गृहस्थांनीं तत्परतेनें दरवाजा उघडून आम्हांला घरांत घेतलें, पडवीवर बोजे उतरवूं लावून पिण्याचें पाणी पुरविलें. आम्हीं आपलीं अंथरुणें पसरलीं. मोटारींमध्यें दांटणीदाटणें नें तासानुतास काढावे लागल्यामुळें आमचीं हाडें खिळखिळी झालीं होतीं. तीं आडवीं पसरलीं मात्र आम्हांला झोपा केव्हांच लागल्या.

दिनांक १९ फेब्रुवारी उजाडूं लागला. सूर्याचीं कोवळीं उन्हें वे. शा. जोगळेकरांच्या वाड्याच्या आसपास पसरूं लागलीं. मी जागा झालों. मला आढळलें कीं नुसतें आमच्या आसपासच तेवढें नव्हे जोगळेकरांच्या सगळ्याच वाड्याभर अनेकभाषापरिषदेचा जसा मंडपच गजबजला होता! पुणें, सातारा, कराड, मिरज, कोल्हापुराकडील माणसें मराठींत, तर बेळगांव सकेश्वर, हुबळी व त्यापलीकडील माणसें कानडींत बोलत होतीं. स्थानिक कुणबी, कुळवाडी पुकारीत होते "बेकु हालू?"—(पाहिजे कां दूध?) तर हिंदी, गुजराथी व तत्सदृश भाषक प्रतिप्रश्न करीत होती "कैसा बेचते? क्या भाव है दूध?" कुळवाड्यांनीं आपल्या उजव्या हातांचीं दोन बोटें उभवून पुढें करावीं व "पाव" नांवाचें दुधाचें छोटेसें माप दुसऱ्या हातीं धरून दाखवत म्हणावें "याडु आनेका वंद पाव". दोघांनींहि एकमेकांस हंसून घ्यावें व सुचवावें की तुमची भाषा आम्हांला कळत नाहीं हो, काय करायचें? तरी चमत्कार असा कीं याहि परिस्थितींत होणारे व्यवहार मात्र बिनचूक व्हायचे! "कानडा ननग गोत्तिल्ला" म्हणून कोणी

आश्चर्यमिश्र खेद व्यक्त करावा तर दुसऱ्यानीं आपल्या अंगींची ही उणीव निवळ हंसण्यावारी घालवीत म्हणावें " तिळुदिल्ला, येन तिळुदिल्ला! " अशापरी त्या एकट्या वाड्यांतच गुजराथी, कानडी, मराठी, हिंदी, कारवारी, कोकणी, तेलगू नि तामिल इत्यादि कितितरी भाषांचा अनामंत्रित नव्हे स्वयंप्रेषित भला मोठा मेळावा श्रीमहादेवाच्या दर्शनार्थं आज जमला होता. अत्यंत मोठी आश्चर्याची गोष्ट कीं, नागपूर वऱ्हाडापासून तों कारवार होनावरापारच्या रहिवाशांच्या त्या संमेलनांतील सर्वांचें लहानमोठ्यांचें दाणापाणी, उठबस, आगत स्वागत, सोय, सवड, देवधर्म आणि आवडीनिवडी या सर्व गोष्टी दक्षपणें आणि आस्थेवाईकपणें झटून पहात होतीं तीं जोगळेकर कुटुंबीय सारींच लहानमोठीं एकोप्यानें निगडित मंडळी ! त्यांच्या त्या एकाच वाड्यांत दहाबारा लहानमोठया बायका, आठनऊ पुरुष माणसें व आठदहा मुलेंबाळें ( देव करो, नि या एकत्र नांदत्या कुटुंबाची अशीच अखंड भरभराट चालो ! ) असा भला भाग्यवंतालाच शोभणारा लाभणारा एकाच घराचा संगीन सरंजाम श्री गोकर्णमहाबळेश्वराच्या कृपेनें आजही एकजुटीनें सुखासमाधानांत नांदतांना आढळतो आहे. एवढें मोठें बलाढ्य कुटुंब एकत्र नांदलेलें पहायला मिळण्यांतहि आज भाग्यवंताचेंच भाग्य पदरीं पाहिजे लागतें असा कालमहिमा आहे !

सकाळीं सात वाजतां जोगळेकरांपैकीं एका कर्त्या पुरुषानें आम्हाला त्यांच्या माडीवरील एक स्वतंत्र खोलीच आंखून दिली. ही खोली म्हणजे त्या भल्या मोठया सात खणी जाबत्याच्या माडीचाच एक खण होता. नारळीच्या झांवळयांचें कुडाण घालून त्या खणाला वारयट साधून पृथकपणाहि दिला होता. आम्हाला लाभलेली खोली होती त्याच माडीवरील अन्य खोल्यांमध्यें कोल्हापूर, सातारा, इचलकरंजी, पुणें इत्यादि ठिकाणांचे कैक लोक यात्रार्थी उतरले होते. त्यांच्या व आमच्या यथाकाल ओळखीदेखी झाल्या वा निघाल्याहि. सुरू झालेल्या गप्पागोष्टींत कांहींना कळलें कीं गोकर्णयात्रा उरकतांच मी रामेश्वरीं यात्रेस सहकुटुंब जाणार आहे. त्यापैकीं कांहीनीं स्टँडर्ड टूर तिकिट

प्रकाराची माहिती माझ्याकडून करून घेऊन त्याप्रमाणें पुढील यात्रांचा बेतही आंखला.

पुण्याचे एक पेनशनर ड्रॉइंगमास्तर श्री. निजंपूरकर यांचा व आमचा थोडा परिचय झाला. हे गृहस्थ मोठे विनोदी, बोलके व प्रासंगिक कोटिक्रमानें आसपासच्या माणसांत चटकन् आकर्षण व लोकप्रियता मिळविण्यांत वाकब दिसले. गोकर्णीं प्रेक्षणीय स्थळें पाहण्यासाठीं हिंडतां हिंडतां आम्ही एका देवळाच्या महाद्वारीं पोंचलों. तेथे फुटबॉलच्या आकाराचे दोन दगडी गोलक दिसले. श्री. निजंपूरकरांना त्यांच्या सोबत चालणाऱ्या त्यांच्या नातीनें विचारलें "नाना हो, हे दगडी फूटबॉल कुणाचे असतील हो ?" हजर-जबाबी आजोबांनीं गंभीरपणें उत्तर दिलें "ही मोठीशी दिसते ना दगडी गोटी ती म्हणे रामाची आणि पलीकडे पडलेली ती छोटी गोटी त्याच्या धाकटया भावाची, त्या लक्ष्मणाची बरें कां ताई !" नातीनें विचारलें "राम लक्ष्मण गोटया खेळायला अयोध्या सोडून इकडे हो कसे आले असतील ?" आजोबा म्हणाले, "तूं नाहीं का परवा त्या विमानानें पुण्याहून मुंबईला उडून गेलीस ? हां, तसेच ते भाऊ भाऊ मोठे खेळाडू उलाढाली होते ! आणि त्यांच्याजवळ त्यांचें तें पुष्पक विमान सदा तय्यार असायचें !" इतक्यांत एका कोरडया पडलेल्या कुंडाकडे बोट दाखवून श्री. निजंपूरकरांना गमतीनें मी म्हणालों "आजोबा त्या रामलक्ष्मणांची गोटया खेळण्याची हीच बहुधा "बद" असेल नाहीं ?" यावर आम्ही सारेच खदखदून हंसलों तें पाहून ती मुलगी मात्र तेव्हांच कांहींशी हिरमुसुली !

त्याच सकाळीं सुमारें आठ वाजतां एक जोगळेकर बंधु आमच्याकडे आले व म्हणाले "चला, देवाची धूळभेट होऊं द्या आधीं आपली." मी म्हणालों "स्नान केल्याशिवायच ?" भटजी किंचित् हंसले व म्हणाले "स्नान उरकल्यावर ध्याल ती धूळभेट कशी होईल ?" तेव्हां नारळ, कापूर व कांहीं इष्ट ती दक्षिणा एवढयाच्या सोबतीनें आम्ही श्री गोकर्ण महाबळेश्वर, श्री पार्वतीमाई व महागणपति या तीनही देवतांना नमस्कारून बिऱ्हाडीं परतलों. एकाच शिवकुटुंबांतील हीं तीनही

देवतें घटक असून दरएकाला वेगवेगळें मंदिर लाभलेले पाहून मला कांहींशी गौज वाटली. राजेसाहेब, राणीसाहेब व युवराजसाहेब, साऱ्याच स्वाऱ्यांना संस्थानिक राजधान्यांमधून आपापले खास महाल असतात त्यापेंकींच हा थाट आढळला ! श्री महाबळेश्वरजी स्वतः अमूर्त असून अष्टौप्रहर पाण्यांतच राहतात– श्री पार्वतीमाता व श्री महागणपति मूर्ति संपन्न आहेत. मातुःश्री आसनावर बसलेल्या आहेत पण गणोबा कायमचेच उभे आहेत. अन्यत्र बहुधा त्यांचें दर्शन घडतें तें बैठें व चार हातीं सजलेलें असतें. गोकर्णीं मात्र त्यांना भक्तजनांनीं दोनच हात ठेवले आहेत ! या संक्षेपाचें प्रत्यक्ष कारण काय असेल तें असो माहीत नाहीं. रावणाकडून हस्तगत केलेल्या आत्मलिंगाच्या भाराखालीं तर ते जायां होऊन गळून पडले नसतील ना ?

ही धूळभेटीचीं दर्शनें आटोपतांच कोटितीर्थी आम्हांला स्नानासाठीं नेण्यांत आलें. या तीर्थांतील पाणी सकृद्दर्शनींच म्हणण्यासारखें मला मलिन वाटतें तर त्यांत स्नानार्थ उतरावें वा न उतरावें या विकल्पानें मी आडलोंच असतों. पण तसें कांहीं झालें नाहीं. गोकर्णीं क्षौर व तीर्थविधि करण्याचें आज मला कारणच नव्हतें. काशीयात्रेच्या वेळीं हीं सारीं मी मागेंच उरकलीं होतीं– वे. मू. जोगळेकरांना ही वस्तुस्थिति मी निवेदली मात्र, तत्काळ संतोषपूर्वक हंसत हंसत ते म्हणाले "यथा यजमानो वांच्छति" व पुढल्या कामीं प्रवृत्त झाले. त्यांनीं आपल्याठायीं बाणवून नांदवलेल्या या संतोषवृत्तीचें मला भारीच कौतुक वाटलें ! अन्यत्र क्षेत्रोपाध्यायांचा मला आलेला अनुभव याहून किती-तरी वेगळा आहे. त्यांची ती अतिलोभाधीनता तिरस्करणीयतेला पार पोचलेली असते. भाविक यजमानाशीं हवा तसा स्वार्थी बुद्धिवाद घालघालून ते त्याला कसातरी तीर्थविधीला प्रवृत्त केल्याशिवाय सोडीतच नाहींत. अथवा त्यांची तुंबडी भरण्याला त्यांना बनणार तरी कसें !

गोकर्ण महाबळेश्वराच्या ऐन मंदिरासमोर अर्ध्या फर्लांगावरच दिवस-रात्र खेळत्या सागराचें नयनमनोहर दर्शन घडतें. आज आयतीच अमावास्या होती. तिनें त्याला आटोकाट भरतीचें वैभव चढूं लागलें होतें. त्या

पुळणीवर मी पाऊल ठेवलें मात्र. त्याच्या त्या उंच उसळणाऱ्या लाटा, त्यांची ती अखंड आदळआपट, तें सरसर मागें मागें जाजाणें नि तितक्याच आवेशाच्या लगबगीनें सरसावून पुढें पुढें येयेणें ! या साऱ्या हालचालींनीं माझ्या मनांत सहज आलें कीं " या सागरानें मी मिरजेचा — पाण्याच्या दुर्मिळतेविषयीं एकदा अत्यंत लोकप्रसिद्ध झालेल्या रहिबासी जनापैकीं एक- म्हणून तर यानें मला ओळखलें नाहीं ? आपल्या अथांग वैभवाचें प्रदर्शन माझ्यापुढें मांडण्याचें त्यानें असें योजून हें चालवलें आहे तरी काय ? मी असा साशंकपणें आणि कांहींशा त्रस्त वृष्टीनें त्या सागराकडे निमिषभर पाहिलें- घटकाभर गोंधळून गेलों- बुजलों नि तितक्यांतच माझें मला हसूं आलें ! पोटींच्या चौदाही रत्नांचें दान याचकांना सहज देऊन मोकळा होणारा दातृजनांचा महाराणा हा रत्नाकर, याच्या उदार अंत:करणांत माझी गरीबाची अशी खोडी करावी असें येईल तरी कसें ? दिमाखानें आपलें वैभव माझ्यापुढें मांडून मला दिपविण्या-हिणवण्यानें हा अशा कोणत्या उंच पदवीला पोचणार आहे? हे वृथा आरोप त्याच्यासारख्या उदारावर करणें मला मुळींच शोभणार नाहीं म्हणून माझें मन आणि दृष्टि मी त्वरित साफ केली. दुसऱ्याच घटकेंत मला वाटलें कीं हा सागर सागर नसून कोणी अत्यंत कुशल मृदंगवादनाचार्यच आपल्या वृंदवादनांत अखंडपणें रंगून गढून गेला आहे. भगवान् महाबळेश्वरांची केव्हां लहर लागेल कोणी सांगावें ! त्यांनीं तांडव नृत्याचा आरंभ करण्यापूर्वीच आपल्या सर्वच वाद्यांची जय्यत तयारी असावी म्हणून तीं जुळवून ठेवण्याची दक्षता तो घेत असावा आणि त्याचाच परिणाम या लाटांचें हें जागतें नादब्रम्ह असावें. त्या सागरपृष्ठीं सारख्या खेळणाऱ्या लाटांकडे पुन्हां पहावें तों वाटतें कीं तांडवनृत्य मांडणाऱ्या भोळया शंकराच्या पायांत बांधलेल्या या घुंगरुमाळाच खुळखुळताहेत, गरजताहेत जशा ! त्या पांढऱ्याशुभ्र फेंसाच्या तरळ ओळीकडे लक्ष जातांच वाटतें कीं भोळया भाविकांच्या शुद्ध मनोवृत्तीच त्या महादेवापायीं लोटांगणामागें लोटांगणें घेताहेत भक्तांच्या अंतर्यामीं अलोट दाटलेला गहिवर महादेवाच्या दर्शनासाठीं उतावीळपणें बाहेर ओसंडतो आहे असा भास त्या किनाऱ्या-

वर येऊन बिलगून राहणाऱ्या समुद्रफेनामुळें होतो. समुद्रालगतचा तो पहाड, त्या पहाडाच्या सर्वांगीं पसरलेली हिरव्या शालीसारखी भासणारी ती हिरवळ, त्या हिरवळींत उडणारे, चरणारे लहानमोठे पक्षी, ती नारळी पोफळीचीं उंच उंच झाडें या सर्वांना चौफेर पसरलेल्या सूर्यनारायणाच्या कोवळया उन्हानें कांहीं वेगळीच मनोहरता प्राप्त झाली होती. श्री महाबळेश्वराच्या परिसरांत सेवेसाठीं त्यांनीं अखंड वसति केली होती. त्यांच्या तपोबलाचेंच जसें तें तेज अंगोपांगीं पसरल्यासारखें दिसलें !

गोकर्ण महाबळेश्वर हा गांव कारवारालगतच्या उत्तर कानंडा जिल्हयांत मोडतो. "पहावें दक्षिणेंत आणि खावें उत्तरेंत" अशी प्रवासि जनातोंडीं नेहमीं खेळणारी एक प्रसिद्ध मराठी म्हण आहे. या म्हणीच्या साक्षात्काराचा श्रीगणेशा पूजायला हौशी प्रवाशांना मिळतो तो या गोकर्णाहूनच मिळतो. दक्षिणी प्रसिद्ध हेमाडपंती विशिष्ट शिल्पानें संपन्न असलेलें या गोकर्ण महाबळेश्वराचें हें देवालय प्रशस्त विस्ताराचें आहे. अनेक तीर्थक्षेत्राठायीं गोमुखद्वारा देवालयांतील तीर्थ बाहेर पोचवलें जातें. या क्षेत्रीं मात्र श्री महादेवाची बैठक आहे तीच गोकर्ण म्हणजे गाईच्या कानाच्या आकाराची आहे. याचमुळें या तीर्थाला गोकर्ण ही सार्थ संज्ञा लाभली आहे. श्रीमहादेवाचें वैशिष्ट्य प्रत्ययाला येतांना त्यांत "तीन वा त्रि" या संख्यांकाला प्रधानता दिली जाते. त्याला बेलाचें त्रिदळच वहावें लागतें. महादेवाहातीं आयुध कल्पिलें आहे तो त्रिशूल आहे. त्याला 'त्रिलोचन', 'त्र्यंबक' अशींच नांवें प्रसिद्ध आहेत. त्याच्या त्रिकालपूजनाचाहि महिमा तसाच विशिष्ट फलदायक मानतात. महादेवाच्या या त्रि प्रियत्वाची साक्ष म्हणूनच म्हणे अनेक शिवालयांना तसेच गोकर्ण महाबळेश्वराच्या या मंदिरालाही तीनच मोठमोठे दरवाजे आहेत. त्रिकाळीं चालणाऱ्या पूजा व आरत्या इत्यादींना पाहण्याची व उपस्थित राहण्याची मुभा सर्वच भाविकांना इथे सारखीच ठेवलेली दिसते सोवळें ओवळें व शिवाशिव या भावनांना अन्यत्र दिलें जाणारें अवास्तव महत्व या ठिकाणीं बरेंच

संक्षेपाला पोचलें आहे हें ठीकच आहे. या देवालयाच्या परिसरांत त्याचप्रमाणें गोकर्ण वास्तूंत ठायींठायीं उदंड शिवलिंगें व त्या लिंगां-सोबत उदंड नागदैवत्यें तशींच इतरहि अनामिक देवदेवतांचे मूर्तिभार मांडलेले आढळतात. याच सोबतीनें "पैसा द्या यजमान, दक्षिणा द्या यजमान" असें म्हणम्हणून यात्रिकांचा पिच्छा पुरवणारे, त्याला कंटाळा आणवणारे कितितरी खरे आणि तोतये पुजारी तसेच सेवेकरी, मुलें व मुलीही या मंदिराच्या आवारांत वावरतात. देवालयाच्या आसपास त्याचप्रमाणें समुद्र-स्नानाच्या वाटेवर दुतर्फा व इतर तीर्थातीर्थांशेजारीं अंध, पंगू व त्यांचे सहकारी धडे खडे धंदेवायिक भिकारी आपापलीं पालें, बिच्छायती पसरपसरून बसलेले असतात. यात्रिकाचें लक्ष आप-ल्याकडे ओढण्यासाठीं कोणी गातात, कोणी वाद्यें वाजवितात, कांहीं आपल्या पोटीं नुसत्या चापटयाच मारत राहतात, कोणी नुसतें भगवद्भजनच करितात. कोणी एकापायीं खडे राहतात तर दुसरे शिरोभागापुरतेच भूमिगत होऊन उलटें शरीर उभवतात.

समुद्राच्या शेजारामुळें गोकर्ण निसर्गसुंदर दिसतें. तिथे या शिवा-लयाखरीज एक रामाचें व दुसरें भरताचें अशीं दोन समुद्रालगतच साधीं मंदिरें आहेत. या राममंदिराच्या अगदीं संनिध समुद्राकांठींच डोंगराचा एक तुटलेला कडा आहे. त्याच्या खोल तळवटीं एक अगदीं मंदमंदशी पाण्याची धारा आहे. हा तुटलेला कडा व ही जलधारा मिळूनच इथे प्रसिद्ध जटायुतीर्थ बनलें आहे. गोकर्ण गांवीं साधारण मध्यावर एक तिसरें देवालय आहे तें भद्रकाली देवीचें. गांवाच्या मानानें येथें व्वापार बरा चालतो. बाजारपेठ आहे ती या शिव-मंदिराच्या आसपास वसलेली आहे तशीच ती मंदिरापुढें पसरलेल्या रस्त्यावरही आहे.

आज फाल्गुन शुद्ध प्रतिपदा दिनांक २४ फेब्रुवारी ५५. आज देवाचा रथ मिरवला कीं महाशिवरात्रीचा पांच दिवसांचा उत्सव सांग झाला. रथ भला मोठा उंच आहे. त्यावर खोदीव नक्षीचें काम बरेंच केलें आहे. वापरलेलें लाकूड शिसू आहे. ध्वजापताकांनीं सर्वांगीं

शृंगारलेल्या रथाचीं चाकें चांगलींच प्रचंड आहेत. रथागाराबाहेर काढून मिरवणुकीसाठीं आधींच रथ ठेवला होता. दक्षिण भारतीं लहान-मोठ्या सर्वसाधारण क्षेत्रांतून देवांचे रथ मिरविण्याची सर्वत्र रूढी आहे. रथ ओढण्याचे नवस अनेक लोक करतात व आदरून तो ओढतातही. या मिरवणुकीला स्थानिकापेक्षां बाहेरचेच लोक उदंड येतात. रथ मिरवे तों लोकांचे थवेच्या थवे त्या कामीं अहमहमिकेनें लोट लोटतात. मिरवणुकीला आज रथ निघाला तों दुपारीं दीड बाजला होता. देवळाच्या आसपास लोकवसति अगदीं दाट आहे मात्र रस्ते अगदींच अरुंद आहेत. त्या मानानें पेठेतील रस्ता मिरवणुकीच्या सोयीचा भला रुंद आहे. यावरूनच मुख्यतः मिरवणूक चालते. देवालयांतून महादेवाची उत्सवमूर्ति पालखीद्वारा रथागारापर्यंत आणली जाते. तेथून ती रथांत घालून मिरवली जाते. रथापुढें अनेकपरीचीं वाद्यें झडत असतात. रथावर केळीं, कवठें, खारका, खोबरें वारंवार आणि विपुलपणें उधळलें जातें. मिरवणुकीला जनसमुदाय तीनचार हजारांवर असतो. मिरवणुकीच्या रस्त्यावर दुतर्फा घराघरापुढे वा दुकानादुकानांपुढे उत्तम रांगोळ्यां घातलेल्या असतात. जोतीं, कट्टे, माड्या, दुकानें सारींच भरगच्च प्रेक्षकांनीं फुलून जातात. गोकर्णकर सारीच प्रजा त्या आनंदोत्सवांत पार गढून जाते. विविध प्रेक्षकांच्या रूपें क्षेत्राच्या परिसरांत जसा आनंदोत्सवच मुक्तपणें इतस्ततः वावरतो असा भास होतो.

हा सोहळा डोळाभर पाहून घेतांच आम्ही तिघेही बिऱ्हाडीं परतलों उपाध्याय जोगळेकर यांची गांठ घेऊन, योग्य ती त्यांची संभावना करून प्रसाद, कुंकू वगैरे पदरीं घेऊन आम्हीं सर्वांनींच मोठ्या प्रेमानें त्यांचा निरोप घेतला. श्री गोकर्ण महाबळेश्वराचें व सागराचेंही पुनश्च एकदा दर्शन घेतलें. आमचा त्याचा अवघा पांचसहा

नसतांना घरचेंहि सांभाळणें आणि परत बाहेरचें काम पत्करणें हें आज अमेरिकन स्त्रीला करावें लागतें. ऑफिस, कारखाना, शाळा, दुकानें हीं तिच्या कामाचीं मुख्य क्षेत्रें झालीं तरी टॅक्सी वा ट्रक्स चालविण्याचीं कामेंहि अमेरिकन स्त्री करीत असते. सबंध नोकरवर्गाचा हिशेब केला तर एकतृतीयांशाहून अधिक स्त्रिया आज नोकरी करणाऱ्या आहेत. पुरुषाच्या बरोबरीनें सर्व क्षेत्रांत नांव कमावणाऱ्या कर्तबगार महिला म्हणून एका बाजूस त्यांची स्तुति होत राहते, तर दुसऱ्या बाजूस घरच्या कर्तव्याकडे साहजिकपणें त्यांचें दुर्लक्ष होतें. आई, बाप दोघेंहि नोकरीवर. घरच्या मुलांवर लक्ष कोण ठेवणार? जास्तींत जास्त मुलें असावींत असें आजच्या अमेरिकन जोडप्यास वाटतें, पण त्यांची योग्य ती निगा राखण्यास त्यांना वेळ आहे काय? मुलांच्या मनाचा विकास कसा होत आहे, त्यांच्या संवयी कशा वाढत आहेत, रिकाम्या वेळांत तीं काय करतात, या गोष्टींचा तपास करावयास कोणास सवड आहे? मुलांत गुन्हेगारी वाढण्याचीं जीं अनेक कारणें जाणत्यांनीं दिलीं आहेत त्यांतील हें एक असल्यानें व आपल्या मध्यम वर्गापुढें आज हाच प्रश्न असल्यानें त्याचा उल्लेख केला आहे. अमेरिकन कुटुंबांत स्त्रीला व मुलांना मिळणाऱ्या स्वातंत्र्याचा कोणीहि हेवा करील. पण त्यांतूनच कांहीं अनर्थपरंपराहि निर्माण होत आहेत. मुलें थोडीं वयांत आलीं कीं, तीं आईबापांना वा शिक्षकांना जुमानीत नाहींत. त्यांच्या वागण्यांत थोडा उद्धटपणा येतो. घरापासून शक्य तों दूर राहण्याचा विचार त्यांना सुचूं लागतो. हायस्कूलपासूनच्या वयांतच प्रत्येकानें आपला जोडीदार निवडून ठेवलेला असतो. इतर प्रलोभनें पुष्कळच आहेत. अशा प्रसंगीं वयांत आलेलीं मुलें थोडीं बेतालच दिसतात. स्वातंत्र्याचा दृश्य परिणाम स्त्रियांच्या बाबतींतहि दिसून येतो. अमेरिकेंत घटस्फोटांची संख्या सर्व देशांपेक्षां अधिक आहे. कौटुंबिक स्थिरतेच्या दृष्टीनें ही गोष्ट अनिष्ट आहे. अशा विच्छिन्न कुटुंबांतील एक तरुण न्यू ऑर्लिन्स येथें माझ्या बरोबर पांच-सहा दिवस अचानकपणें होता. त्याची मर्मभेदक कहाणी सर्वांना विचार करावयास लावणारी आहे. आपल्या स्वातंत्र्याला थोडी मुरड घालून शेवटीं तडजोडीनें मिळतें घेणें यांतहि समाधान आहेच कीं नाहीं कांहीं?

स्वातंत्र्याच्या याच विचित्र कल्पनेपोटीं आणखी एक गंभीर प्रश्न अमेरिकेंत माझ्या ध्यानीं आला. या देशांत आई आणि वडील आपल्या मुलांच्याबरोबर कधींहि राहत नाहींत. मुलगा बायकोस घेऊन एकाच गांवांत दुसरीकडे राहतो किंवा आपलें घर मुलास विकत देऊन आईबाप तरी दुसरीकडे बिऱ्हाड थाटतात. मुलाच्या संसारांत—सुनेच्या संसारांत—आम्ही कशाला आणि आमच्या संसारांत त्यांचा अधिकार कशाला, असा विचार आईबाप करतात. कांहीं प्रसंगीं ही वडीलधारी मंडळी मुलांना, नातवंडांना भेटावयास येतात; पण एकत्र राहणें तेथें कोणासच पसंत नाहीं. वरवर ही व्यवस्था फार चांगली दिसत असली तरी किती तरी गंभीर प्रश्न यांत गुंतलेले आहेत. नवरा दिवंगत झाल्यावर एकाकी दिवस कंठणारी त्याची म्हातारी बायको वा पत्नी निवर्तल्यावर एकाकी आयुष्य काढणारा म्हातारा पती यांचें उरलेलें जीवन थोडें भयानक वाटतें. अनेक वेळां ' यंग मेन्स खिश्चन असोसिएशन ' मध्यें राहणाऱ्या अनेक म्हाताऱ्या लोकांना पाहून मला कमालीचा विषाद वाटला. सस्थेचें नांव ' ओल्ड मेन्स खिश्चन असोसिएशन ' असेंच ठेवण्याची पाळी आली आहे असें वाटलें. ही मंडळी एकटीच राहतात, एकटीच जेवण करतात आणि एकट्यानेंच कोठें कोपऱ्यांत बसून तासन् तास टेलिव्हिजन पाहतात. एका वृद्ध माणसानें आपल्या मुलांबाळांत, नातवंडांत जाऊन राहण्याची इच्छा मला अश्रुपूर्ण नयनांनीं निवेदन केली. पण प्रस्थापित रूढीचा फायदा मुलेंहि घेतात आणि आईबापांकडे दुर्लक्ष करतात ! वृद्धालयें का हा प्रश्न सोडवणार आहेत ? अमेरिकन लोकांपुढें हा मोठा गंभीर प्रश्न आहे. विख्यात कथालेखिका पर्ल बक हिनें आपल्या आत्मवृत्तांत अमेरिकन समाजांतील नेमक्या याच दोषावर बोट ठेवून मोठी कडक टीका केली आहे. त्याचबरोबर पूर्वेकडे दिसून येणाऱ्या कुटुंबसंस्थेचें तिनें मनापासून गोडवे गाइले आहेत. आपल्याकडेहि समाजरचना झपाट्यानें बदलत आहे. हाच प्रश्न आपणांसहि भेडसावणार नाहीं कशावरून ?

अमेरिकन माणसाची प्रीति पैशावर आहे हेंहि नाकारून चालणार नाहीं. तसें पाहिलें तर पैसा कोणास नको आहे ? पण अमेरिकन मनुष्य सर्व कांहीं मोजतो तें पैशाच्या मापानें. श्रीमंती असल्यानें अनेक वस्तु

मोफत वांटतील, पण त्यामागें प्रचाराचा, व्यापाराचा हेतु असणार. मी कुटुंबांत तीन महिने राहिलों होतों. मला आलेले विविध अनुभव मी इतरत्र सांगितले आहेत. पण पेइंग गेस्ट म्हणून आलेल्या अनुभवाची वाच्यता येथेंच प्रथम करीत आहें. पैसा सढळ हातानें, विचार न करतां खर्च करण्याचा माझा खरें म्हणजे स्वभाव. पण अमेरिकेंतील माझ्या मालकीण–होस्टेस–ज्या तऱ्हेनें हिशोब करीत असे तसा हिशोब मी कधींच पाहिला नव्हता. म्हणजे हिशोबाच्या दृष्टीनें तो अगदीं बरोबर असे, पण पूर्वेकडील मनास तो निःसंशय खटकणारा होता. कित्येक लोकांचा हा एक धंदाच होऊन बसला आहे. अमेरिकन माणूस कोणत्या वस्तूचा धंदा करील त्याचा नेम नाहीं. आपल्या येथील ' अतिथि ' शब्दाचें गांभीर्य तेथें उरलेलेंच नाहीं. पाहुणा शब्दाचा अर्थ बहुधा ' पैसे रोख मोजणारा पाहुणा ' असाच तेथें रूढ आहे. पैशांची अशी देवाण–घेवाण नात्या-नात्यांतहि चालते. पैशानें न मोजतां येणाऱ्या कांहीं गोष्टी आहेत याची जाणीव फार थोड्या अमेरिकन लोकांना आहे.

अमेरिकन लोकांबद्दल एक अढी माझ्या मनांत कदाचित् उगाचच असेल, पण ती आहे. मांसाहार त्यांना अतिशय प्रिय आहे. एकंदर लोक अति खादाड. सर्वांना मांस अतिशय प्रिय; कोंबडी, डुक्कर आणि गाय यांचें मांस फार आवडतें. एका शेतकऱ्याकडे मी पाहुणा म्हणून होतों. किती तरी उत्तम उत्तम टर्की कोंबड्या त्यानें पाळल्या होत्या. मला ती सजीव संपत्ति पाहून खूप गंमत वाटली. मी त्यांचें एक छायाचित्रहि घेतलें. त्यावर तो म्हणतो, ' बरें झालें, पुढल्या आठवड्यांत एकहि दिसणार नाहीं. 'थँक्स् गिव्हिंग डे'ला यांचेंच पक्वान्न असतें. ' मी वरमलों. एवढा सुंदर देश परमेश्वराने दिला म्हणून नोव्हेंबर महिन्यांत परमेश्वराचे आभार सर्व लोक मानतात; व त्यासाठीं लक्षावधि कोंबड्यांचा संहार होतो ! मी मुद्दामच कांहीं कत्तलखाने पाहिले. दर मिनिटास एक गाय मारण्याचा विक्रम करणारीं यंत्रें या देशांत आहेत. मिनिटास चार-पांच डुकरें मारण्याची सोय येथें आहे. हा सर्व भयंकर प्रकार मी तास दीड तास उभा राहून पाहत होतों. माझ्या या विक्षिप्त वागण्याचा अर्थ बरोबरच्या लोकांना समजण्यासारखा नव्हता. स्वतःचें मांस व स्वतःची

चरबी वाढविण्यासाठीं माणसानें केवढा हा प्राणिसंहार चालवलेला आहे ! ' अजातशत्रु तरुवरा । सर्वांगीं देवविल्या शिरा ॥ ' म्हणून औषधासाठीं झाडाचा चीक घेणाऱ्या माणसास दोष देणाऱ्या ज्ञानेश्वराचा संस्कार माझ्या मनावर असल्यामुळें माझें पौर्वात्य मन विरवळून गेलें. पण यांत पौर्वात्य पाश्चिमात्य काय आहे ? मांसाहाराचा धिक्कार करणारे अमेरिकेंत थोडे लोक आहेतहि. आणि हिंदुस्थानांत काय थोडी प्राणिहत्या होते ? आपल्याकडे काय मांसाहारी लोक नाहींत ? आणि समजा उद्यां येथील प्राणिहत्या थांबली, मांसाहार बंद झाला, तर आधींच अर्धपोटीं असणारा हा देश खाणार तरी काय ? आधुनिक अर्थकरणाशीं निगडित होणारा हा प्रश्न आहे हें शेवटीं मान्य करावेंच लागतें.

शेवटीं आणखी एक–दोन प्रश्नांचा उल्लेख करतों. तेथील लोकांच्या नीतिमत्तेबद्दल अनेक लोक विचारतात. आणि या प्रश्नाचें उत्तर देणें मोठें कठीण काम आहे. एक तर नीतीच्या कल्पना सर्व देशांत सर्व काळीं सारख्या आहेत असें नाहीं. ज्याला आपण सभ्यता म्हणूं त्याला दुसरें असभ्य म्हणतील. मांड्या आणि छातीचा भाग उघडा टाकून हिंडणाऱ्या अमेरिकेंतील मुली भारतांतील स्त्रियांना पोट उघडें ठेवून चोळी वा पोलकें घातल्याबद्दल हंसतात, नांवें ठेवतात. त्यांना साडी मनापासून आवडते. पण पोट उघडें टाकणें असभ्यतेचें वाटतें. मुलांमुलींना कमालीचें स्वातंत्र्य असतें व तेवढीच जबाबदारीची जाणीव असते. सर्वत्र स्वैराचार आहे असें नाहीं. शास्त्रशुद्ध दृष्टीनें चालणारा देश असल्यानें प्रत्येक नैतिक गुन्ह्यांची नोंद घेऊन वर्षांची आंकडेवारी तेथें घेतली जाते. किन्से रिपोर्ट या बाबतींत अतिशय प्रसिद्ध आहे. पण अशी आंकडेवारी आपल्या देशांत शक्य आहे काय ? ती तशी उपलब्ध झाल्याखेरीज तुलनात्मक बोलणें व्यर्थ आहे. त्या देशांत या प्रकाराची प्रकटपणें चर्चा करण्याची प्रथा आहे. आपण या गोष्टी प्रकट होऊं देत नाहीं. नैतिक गुन्हे व्हावयास ज्या मानानें तेथें वाव आहे त्या मानानें तशी संख्या फार कमी असावी. अमेरिकेंतील निशा संघाबद्दलहि ( Night Club ) वारंवार बोललें जातें. या प्रान्तांत असणारें गलिच्छ वातावरण कांहीं अंशीं खरें असतें. अतिरिक्त मद्यपान

आणि रस्त्यावर, चव्हाट्यावर होणारें स्त्री-सौंदर्याचें प्रदर्शन किळसवाणें असतें. आपल्याकडील वेश्या-व्यवसायाला येथें संभावितपणाचें रूप दिलेलें आढळतें. असो. याबद्दल एवढेंच पुरें.

जगाला समतेचीं तत्त्वें शिकविणारी अमेरिका अजूनहि दाक्षिण भागांत निग्रोंना दूर ठेवते. न्यू ऑर्लिन्स या दाक्षिणेकडील सर्वांत मोठ्या शहराचा अनुभव मोठा विलक्षण आहे. रेल्वे स्टेशन दोन विभागांत दिसलें. एक गोऱ्या लोकांसाठीं, दुसरें काळ्या लोकांसाठीं. सार्वजनिक बसमध्यें मागच्या जागा निग्रो लोकांसाठीं असतात. पुढल्या जागेवर तो बसूंच शकणार नाहीं. निग्रोंच्या शाळा वेगळ्या, चर्चेस वेगळीं, त्यांचीं हॉटेल्सहि वेगळीं. आणि हें सर्व कायद्यानें ठरलेलें. आम्ही अस्पृश्यांना कसें वागविलें हेंहि याच वेळीं ध्यानांत येतें.

प्रारंभीं सांगितलें आहेच कीं, खिस्ती मनुष्य धर्माच्या बाबतींत मोठा कडवा आहे. सर्व जगांत आपलाच धर्म प्रसारित व्हावा म्हणून शेंकडों मिशनरी अमेरिकेंतून सर्वत्र रवाना होतात. चीन, जपान, मलाया, ब्रह्मदेश इत्यादि देशांत त्यांना जेवढें यश आलें त्याच्या शतांशहि कार्य हिंदुस्थानांत झालें नाहीं याचें वैषम्य त्यांना फार वाटतें. आमच्याबरोबर असणाऱ्या ईजिप्त, जपान, मलाया, बर्मा या देशांतील स्त्रिया युरोपियन पोषाख चटकन आत्मसात् करूं शकल्या, पण भारतांतील स्त्रियांनीं साडीसच्च महत्त्व दिलें. या चिवट संस्कृतीचें त्यांना मोठें नवल वाटतें. प्रत्येकास आपापला धर्म प्यार आहे असें सांगणारा फक्त हिंदु धर्मच आहे, हें सांगणाऱ्या विवेकानंदांची कथा त्यांना विचार करावयास लावते. हिंदु धर्माचीं उदात्त तत्त्वें व विशाल जीवनदृष्टि त्यांना अतिशय महत्त्वाचीं वाटतात. मानवाचीं शाश्वत मूल्यें, धर्म, संस्कृति, तत्त्वज्ञान याविषयीं पाश्चिम गोलार्ध पूर्व गोलार्धांतील भारताचें साह्य मागत आहे. 'We are but babies to them in deep things' म्हणून ते तशी कबूलीहि देतात. आपणहि या वचनाचा अर्थ नीट समजावून घेतला पाहिजे. एकारलेल्या जीवनास यापुढें जगांत किंमत नाहीं. जोंपर्यंत शेंकडों लोक अर्धपोटी आहेत, उपाशी आहेत, रोगराईचा फैलाव आहे, अज्ञानाचे डोंगर उभे आहेत, आपआपसांतील कलह आहेत, राहावयास घरें नाहींत, अंगावर वस्त्रें नाहींत,

खावयास अन्न नसल्यानें शरीरें वाऱ्यानें उडणारीं झालीं आहेत तोंपर्यंत पूर्वेकडील अध्यात्म कोण ऐकणार ? उपनिषदांचा आणि गीतेचा उपदेश कोणास पटणार ? पूर्वेकडे टिकून राहिलेल्या या संदेशास उच्च रवानें आकार धारण करण्यास तरी शक्ति हवी ना ? ती जर आली तरच पूर्व आणि पश्चिम यांचें मीलन एकमेकांचे दोष वगळून मोठ्या आकर्षक स्वरूपांत होईल. एरव्हीं अंधानुकरणच व्हावयाचें असेल तर पुन्हां तेच प्रश्न सर्वांना भीति दाखविण्यास तयार आहेत.



REFBK-0010190